**विविध पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी सेवाभावी संस्थांची निवड करण्यासाठीचे धोरण.**

**काही निकांषामध्ये सुधारणा.**

अपमाउ ०१/८

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु १००४/प्रक्र.९७/पापु ०७,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२. दिनांक :- २९ मे,२००४.**

**वाचा :-** (१) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्र.ग्रापापु १००२/प्रक्र.५३७/पापु ०७, दिनांक ३० मार्च, २००२.
(२) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्र.एसओ २००३/प्रक्र.५१/पापु १२, दिनांक २९ मे, २००३.

**प्रस्तावना :-**

राज्यात राबविल्या जात असलेल्या विविध पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरीय अंमलबजावणीसाठी सह सेवाभावी संस्थांच्या सेवा प्रमाणावर आवश्यक असल्याने सक्षम व सेवाभावनेनेच काम करणा-या सेवाभावी संस्थांची निवड करण्यासाठी **निकष व पध्दत** संदर्भिय शासन निर्णय **दि.३०.३.२००२** व **२९.५.२००३** अन्वये ठरवून देण्यात आले आहेत. या निकषात व मार्गदर्शक सूचनामध्ये काही बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

संदर्भिय क्र.१ येथील शासन **दि.३०.३.२००२** मधील **निकष क्र.अ (ii)** अन्वये सेवाभावी संस्थेच्या पोटनियमात पाणी पुरवठा व स्वच्छता याबाबत कामकाज करण्याची तरतूद असावी,असे नमूद केले आहे. परंतु सेवाभावी संस्था जर **पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात सध्या काम करीत** असतील व त्यांना इतर नैर्सर्गिक साधनसामुग्रीच्या लोकसहभागी व्यवस्थापनाचा अनुभव असेल व केवळ पोट नियमात सध्या तरतूद नसेल तर अशा संस्थांची पॅनेलवर इतर सर्व निकषाप्रमाणे निवड होत असल्यास ६ महिन्यांच्या आत त्यांनी पोट नियमात विहित मार्गाचा अवलंब करुन तशी तरतूद करुन घेण्याची मुभा देण्यात यावी.

२. संदर्भिय क्रमांक १ येथील शासन निर्णय **दि.३०.३.२००२** मध्ये सेवाभावी संस्थेचे निवडीचे **निकषांमध्ये निकष क्र.अ (v)** मध्ये संस्थेच्या नियामक मंडळावर/संचालक मंडळावर **शासकिय, निमशासकीय, शासन मदत प्रत्यक्ष मिळणा-या संस्था** यातील पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, जिल्हापरिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी, अधिकारी, सदस्य, ग्रामपंचायतीतील पंच, विद्यमान मा. आमदार, मा.खासदार यांचा किंवा त्यांच्या निकटतम नातेवाईकांचा समावेश नसावा असा आहे. यामध्ये **"निकटतम नातेवाईक"** या संज्ञेत **पती -पत्नी, आई-वडिल, मुलगा-मुलगी, बहिण-भाऊ, सुन-जावई, सासु-सासरे, नातू-नाती** व त्यांचे **पती/पत्नी** यांचा समावेश करण्यात आला होता. आता या शासन आदेशाव्दारे **"निकटतम नातेवाईक"** या संज्ञेत येणा-या नातेवाईकांची व्याप्ती कमी करण्यात आली असून यामधून **सासू-सासरे, नातू-नाती व त्यांचे पती/पत्नी या नात्यांना वगळण्यात येत आहे.** त्यामुळे आता **"निकटतम नातेवाईक"** या संज्ञेत **पती /पत्नी, आई -वडील, मुलगा-मुलगी, बहिण -भाऊ, सुन-जावई यांचाच केवळ समावेश होईल.**

३. संदर्भीय क्र.२ येथील दिनांक २९.५.२००३ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-फ"** सहाय्यकारी संस्थांच्या सविस्तर मुल्यांकनाकरिता गुण वितरण पध्दती मध्ये तपशीलवार मुल्यांकना करिता गुण वितरण

D:\BACKUP WS०७\My Documents\GR.WS.०७.doc

पध्दती देणे आवश्यक असल्याने संदर्भीय क्रमांक २ येथील दिनांक २९.५.२००३ च्या शासन निर्णयासोबतचे **परिशिष्ट-फ** रद्द करुन या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **सुधारित "परिशिष्ट-फ"** मधील गुणांकन पध्दती सेवाभावी संस्थांच्या सविस्तर मुल्यांकनाकरिता यापुढे वापरण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सुधीर ठाकरे )**
**उपसचिव,महाराष्ट्र शासन.**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई.
८. विभागीय आयुक्त (सर्व) .
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
११. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१२. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
१३. जिल्हाधिकारी (सर्व)
१४. प्रकल्प व्यवस्थापक, जागतिक बॅंक प्रकल्प, आर.एस.पी.एम.यु. बेलापूर, नवी मुंबई
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१६. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१७. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१८. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता)
२१. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता)
२२. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी नवी मुंबई
२३. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२६. ग्राम विकास व जलसंधारण विभाग
२७. मंत्रालयातील सर्व विभाग
२८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२९. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

"परिशिष्ठ-क"

सहाय्यकारी संस्थांच्या सविस्तर मुल्यांकनाकरीता सुधारित गुण वितरण पध्दती

| निकष<br>(१) | कमाल गुण<br>(२) | |
|---|---|---|
| | मुख्य मुद्दा<br>(२अ) | तपशीलवार<br>(२ब) |
| (१) पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सुविधांचे नियोजन, लोकसहभाग, आखणी,अंमलबजावणी, दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, प्रशिक्षण यामधील सहभाग, लोकसहभागावर आधारित कामांचा पूर्वानुभव (अनुभव किमान १ वर्षापेक्षा जास्त असावा) | २० | |
| **अ. कार्यक्रमाचे स्वरुप - पाणी पुरवठा सुविधा** | (६) | |
| १. नियोजन | | २ |
| २. अंमलबजावणी | | २ |
| ३. देखभाल व दुरुस्ती | | २ |
| **ब. स्वच्छता** | (५) | |
| १. जाणीव जागृती - मागणी मिळविणे | | ३ |
| २. बांधकाम - अंमलबजावणी | | २ |
| **क. लोकसहभाग** | (५) | |
| १. पी.आर.ए. चा अनुभव | | १ |
| २. गटबांधणी,पाणी समितीची बांधणी | | १ |
| ३. ग्रामसभा | | १ |
| ४. आरोग्य शिक्षण | | १ |
| ५. लोकवर्गणी जमा करणे | | १ |
| **ड. प्रशिक्षणाचा अनुभव --** | (४) | |
| १. तांत्रिक प्रशिक्षण | | १ |
| २. पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे प्रशिक्षण | | २ |
| ३. आर्थिक व्यवस्थापन संबंधीचे प्रशिक्षण - बचत गट इत्यादी | | १ |
| **(२) पाणलोट क्षेत्र विकास, जलसंधारण अथवा नैसर्गिक साधनसामुग्रीच्या व्यवस्थापनातील कामांचा पूर्वानुभव** | १० | |
| १. पाणलोट क्षेत्र विकास राबविलेले प्रकल्प संख्या- >३(३),१-३(२),< १(०) (वृक्षारोपण,नालाबंडींग,समांतर चर,गली प्लगींग,गॅबियन चेक डॅम,इत्यादी) | | ३ |

| निकष<br>(१) | कमाल गुण<br>(२) | |
|---|---|---|
| | मुख्य मुद्दा<br>(२अ) | तपशीलवार<br>(२ब) |
| २. जलसंधारण निगडीत राबविलेले प्रकल्प संख्या - >३(३),१-३(२),< १(०) (कोल्हापूर बंधारा,पाझर तलाव,भूमिगत बंधारा,इतर अपारंपारीक पर्याय) | | ३ |
| ३. जंगल व्यवस्थापन, जल आणि मृदू संधारण कार्यक्रम (सहभागी जंगल व्यवस्थापन व नैसर्गिक साधन संपत्ती जोपासण्याचे इतर प्रकल्प) | | २ |
| ४. राबविलेले प्रकल्प नाबार्ड / वॉटर / डीआरडीए / जल आणि मृदू संधारण विभाग महाराष्ट्र शासन यांच्याबरोबर राबविले असल्यास (२) नाहीतर (०) | | २ |
| **(३) माहिती,शिक्षण व लोकसंपर्क,आरोग्य शिक्षण,महिला व बालविकास कुटुंबनियोजन,आदिवासी कल्याण या कार्यक्रमातील कामांचा पूर्वानुभव** | ५ | |
| १. माहिती,शिक्षण व लोकसंपर्क | | १ |
| २. आरोग्य शिक्षण | | १ |
| ३. महिला व बालविकास | | १ |
| ४. कुटुंबनियोजन | | १ |
| ५. आदिवासी कल्याण | | १ |
| **(४) खालील क्षेत्रातील प्रशिक्षण देण्याची व्यवस्था,उच्चशिक्षित व अनुभवी प्रशिक्षक,अद्ययावत प्रशिक्षण केंद्रांची उपलब्धता** | १५ | |
| १. **तांत्रिक विषयातील तज्ञ,** बी.ई.सिव्हील (५), डीप्लोमा सिव्हील (३), बी.ई.ॲग्रीकल्चर किंवा सर्टिफिकेट सिव्हील (१) | | ५ |
| २. **व्यवस्थापन**<br>समुदाय व्यवस्थापनासाठी समाजकार्य पदवी व पाच वर्षाचा अनुभव (३), अनुभव नसलेले समाज कार्य पदवी (२), पदविका किंवा अनुभवी पॅराप्रोफेशनलस् समाजकार्यकर्ते | | ३ |
| ३. **सामाजिक लेखा परिक्षण -** बचत गट,पतपेढी किंवा सहकारी सोसायटींच्या आर्थिक व्यवस्थापन प्रशिक्षणाचा अनुभव | | २ |
| ४. **प्रशिक्षण केंद्रांची उपलब्धता**<br>त्याच जिल्हयात संस्थेचे प्रशिक्षण केंद्र असल्यास (५), संस्थेचे केंद्र नाही पण इतरांची केंद्रे वापरत असल्यास व संस्थेकडे हकश्राव्य सुविधा असल्यास(३), जिल्हयात इतरांची केंद्रे आहेत व संस्थेकडे हकश्राव्य सुविधा नाहीत (२), इतरांची सोय जिल्हयात नसल्यास (०) | | ५ |

| निकष (१) | कमाल गुण (२) | |
|---|---|---|
| | मुख्य मुद्दा (२अ) | तपशीलवार (२ब) |
| **(५) विशिष्ट तांत्रिक व शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेला तज्ञ कर्मचारी वर्ग** | २० | |
| **अ. टीम लीडर / संस्थेचे संचालक / कार्यकारी मंडळ / विश्वस्त** | (५) | |
| १. किती प्रकल्पांपासून संस्थेचे टीम लीडर आहेत - (>२ प्रकल्प(२) / २ प्रकल्प (१.५) / १ प्रकल्प (१) / एकही प्रकल्प नाही (०) | | २ |
| २. पाणी पुरवठा प्रकल्प राबविण्याचा अनुभव (होय (१) / नाही (०)) | | १ |
| ३. टीम लीडर म्हणून तांत्रिक प्रकल्प हाताळण्याचा अनुभव(होय(१)/नाही (०)) | | १ |
| ४. दोन देशांतील अर्थसहाय्य प्रकल्प (१) / परदेशी देणगी देणा-या संस्था (१)/ शासकीय संस्था (१) यांच्याशी समन्वय साधण्याचा अनुभव | | १ |
| **ब. या प्रकल्पासाठी उपलब्ध होणा-या तांत्रिक कर्मचा-यांचा अनुभव व शैक्षणिक अर्हता** | (७) | |
| १. तांत्रिक कर्मचा-यांमध्ये किमान १ पदवीधारक व २ पदविका धारक अभियंता(२) / फक्त पदविका धारक (१)/ तांत्रिक कर्मचारी नाही (०) | | २ |
| २. योजनेचे नियोजन,देखरेख आणि देखभाल-दुरुस्तीमधील अनुभव (या सर्व बाबींमधील अनुभव(२)/ २ बाबींमधील अनुभव(१) / एकाच बाबींमधील अनुभव (०.५) / नसल्यास (०) | | २ |
| ३. पाणलोट क्षेत्र विकासातील अनुभव - (होय (१) / नाही (०)) | | १ |
| ४.स्वच्छता कामातील अनुभव - (होय (१) / नाही (०)) | | १ |
| ५. तांत्रिक कामातील संगणक वापरातील अनुभव - (होय (१) / नाही (०)) | | १ |
| **क. सामाजिक विकास क्षेत्रातील कर्मचा-यांचा अनुभव व शैक्षणिक अर्हता** | (८) | |
| ६. किमान २ समाज कार्य पदवीधारक(२) / किमान १ समाज कार्य पदवीधारक(१) / नसल्यास (०) | | २ |
| ७. पी.आर.ए.किंवा तत्सम पध्दतीव्दारे सहभागी गाव विकास आराखडा किंवा कार्यक्रमांचे नियोजन करण्याचा अनुभव असल्यास (१) / नसल्यास (०) | | १ |
| ८. संस्थेच्या कार्यक्रमांसाठी आय.ई.सी. साहित्य/माहिमांचा अनुभव (१) / नसल्यास (०) | | १ |
| ९. संस्थेच्या कर्मचा-यांना ग्रामीण पाणी पुरवठा,स्वच्छता अभियान आणि पाणलोट क्षेत्र विकासाचा अनुभव असल्यास - तीनही क्षेत्रांचा अनुभव असल्यास (२)/कोणत्याही २ क्षेत्रांचा अनुभव(१)/ एकाच क्षेत्राचा अनुभव असल्यास (०.५) / नसल्यास (०) | | २ |

| निकष (१) | कमाल गुण (२) | |
|---|---|---|
| | मुख्य मुद्दा (२अ) | तपशीलवार (२ब) |
| १०. पंचायत राज्य संस्था,गाव पातळीवर संस्था किंवा गट, बचत गट यांच्यात प्रशिक्षणाचा अनुभव (१) / नसल्यास (०) | | १ |
| ११. महिला सबलीकरण कार्यक्रमांचा अनुभव | | १ |
| **(६) सामाजिक,शैक्षणिक,आरोग्य,सांस्कृतिक,पर्यावरण,ग्रामीण तंत्रज्ञान विकास, कृषी या क्षेत्रातील संशोधन व विकास कार्य** | ५ | |
| १. वरील पैकी कोणत्याही क्षेत्रात संशोधन केले असल्यास व त्याबद्दलच्या सविस्तर बाबी अर्जात उल्लेख केलेल्या असल्यास (१.५) / नसल्यास (०) | | १.५ |
| २. वरील पैकी प्रत्येक क्षेत्रातील विकास कामे संस्थेने केलेली असल्यास प्रत्येक क्षेत्रासाठी ट्ठ गुण | | ३.५ |
| **(७) जिल्हा / राज्य /राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रातील कामगिरीसाठी मिळालेले पुरस्कार** | ५ * | |
| १. जिल्हा स्तरावरील पुरस्कार | | २ |
| २. राज्य स्तरावरील पुरस्कार | | ३ |
| ३. राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार | | ४ |
| ४. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार | | ५ |
| **(८) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात गट / जिल्हा / विभाग / राज्य पातळीवरील पुरस्कार प्राप्त गावामध्ये केलेले कार्य / यशवंत ग्राम समृध्दी योजना / शीव कालीन पाणी साठवण योजना यामध्ये केलेले कार्य व अनुभव** | ५ * | |
| १. गट स्तरावरील पुरस्कार | | १ |
| २. जिल्हा स्तरावरील पुरस्कार | | २ |
| ३. विभाग स्तरावरील पुरस्कार | | ३ |
| ४. राज्य स्तरावरील पुरस्कार | | ४ |
| ५. राज्य स्तरावरील पुरस्कार + यशवंत ग्राम समृध्दी योजना व शिवकालीन पाणी साठवण योजना यामधील भरीव कामगिरी | | ५ |
| **(९) संस्थेमधील कार्यरत पदाधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये महिलांचे प्रमाण** | ५ * | |
| १. पदाधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण संख्येच्या ५०% पेक्षा कमी | | ० |
| २. पदाधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण संख्येच्या ५१% ते ८०% | | २ |
| ३.पदाधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण संख्येच्या ८१% ते ९०% | | ४ |
| ४. पदाधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण संख्येच्या ९०% पेक्षा जास्त | | ५ |

| निकष (१) | कमाल गुण (२) | |
|---|---|---|
| | मुख्य मुद्दा (२अ) | तपशीलवार (२ब) |
| (१०) संस्थेच्या आर्थिक क्षमता | १० | |
| 1. Current Ratio (more than 1.5(2) 1-1.5(1) below 1 (0)) | | २ |
| 2. Net Worth (should be positive) | | २ |
| 3. Debt Equity Ratio (below 1(1) more than 1 (0)) | | १ |
| 4. Ratio of expendituture on Object of trust to total expenditure(60:40(2)/50:50 (1) otherwise (0) | | २ |
| 5. Establishment to total income (more than 10% (0) less than 10% (1) | | १ |
| 6. Remuneration of trustee to total income (more than 10%(0) less than 10% (0) | | १ |
| 7. Amount transfer to reserve fund (more than 10% (1) less than 10% (0) | | १ |
| एकुण | १०० | १०० |

**(*मुद्दा क्र.७,८,९ मध्ये स्तंभ २ ब पैकी कोणत्याही एकाच रकान्यातील गुण मिळतील याची नोंद घ्यावी.)**